# बेडी

मानसी धाड्कन दरवाजा उघडून आत आली व जिजींना मिठी मारून रडू लागली. तिने दिलेल्या बातमीने जिजी चक्रावून गेल्या, परंतु तिला धीर देणे गरजेचे होते.
"मानू, शांत हो. प्रसंग कठीण आहे. धैर्याने हाताळला पाहिजे. परिस्थिती बदलता येत नसेल तर मनस्थिती बदलली पाहिजे. मी एक पर्याय सुचवते."
त्यांचा पर्याय ऐकून मानसी व मनोज हादरून गेले.
"जिजी, काहीतरीच काय? कसं शक्य आहे हे?"
"विज्ञान तंत्रज्ञानाची खूप प्रगती झाली आहे. तुम्ही काळजी करु नका."
जिजींनी त्यांची समजूत घातली.

कार्यवाही सुरु झाली. जिजी व मानसी रोज संध्याकाळी बाहेर जात. कालांतराने ते बंद झाले. मानसी व मनोज सकाळी कामावर जात व संध्याकाळी घरी येत. जिजी घरातच असत.
"जिजी, सगळं घरातलं काम तुलाच करावं लागतं. काळजी घे ग बाई."
"मानू, तू काळजी करू नको. हे काम आहे म्हणून वेळ तरी जातो. कामाला बाई नको."
"पण व्यवस्थित खातपित जा. रेडिओ, टि.व्ही. लाव."
"सगळं करते गं मानू. टि.व्ही. लावते आवाज बंद करून, मूकचित्रपटासारखा."

जिजींच्या सूचनेनुसार मानसी व मनोज जाताना बाहेरून कुलूप लावून जात. आल्यावर दरवाजा उघडून हळूच आत प्रवेश करीत. सोसायटीच्या सभासदांनी जिजींची चौकशी करण्याचा धोशाच लावला.
"जिजी आजारी आहेत का? बाहेरगावी गेल्या आहेत का? बाहेरून कुलूप असलं तरी आतून कसलेतरी आवाज येत असतात."
"अगंबाई, म्हणजे येता जाता दाराला कान लावून कानोसा घेता की काय?"
काहीतरी करून मानसी उत्तर देण्याचे टाळत होती. सोसायटीचे सेक्रेटरी प्रश्न विचारून मनोजला भंडावून सोडत होते. एका संध्याकाळी माधवचा म्हणजे मानसीच्या भावाचा अमेरिकेहून फोन आला.
"मानू, कसे आहात सगळे? विशेषतः जिजी?"
"दादा, आम्ही सगळे बरे आहोत. थांब जिजीशी बोल."
"राजा, कसा आहेस रे? कधी येतो आहेस?"
"जिजी, येईन मी लवकरच. जिजी, शरद नवाथे तिकडून आला आहे. तो आपल्या घरातल्या विषयी काहीतरी सांगत होता."
"सांगू दे रे काहीही, सगळं साफ आणि स्वच्छ आहे. तू निर्धास्त राहा."

"जिजी, माझा मित्र अंकुश जोशी आहे ना, त्याची बहीण मला आवडली आहे. तुला सूनमुख बघायची घाई झाली आहे ना?"
"म्हणून तू लग्न करणार का? लब्बाड .ही वन्संबाई बघ कशी डोळे वटारून बघतेय. तिला देते गुड न्यूज."
जिजींना वाटले माधव येईपर्यंत सगळे व्यवस्थित पार पडलेले असेल.
नंतर मनोज मानसीनी जाण्यायेण्याच्या वेळा बदलल्या. दोघांपैकी एकजण लवकर जाऊन लवकर यायचा. दुसरा उशिरा जाऊन उशिरा यायचा. पुन्हा सभासदांची आपसातील कुजबुज चालू झाली. एक दिवस--
---------------------------------------------------
सकाळीच टॅक्सीमधून मनोज, मानसी व जिजी उतरले. मानसीच्या हातात नवजात बालक होते. सोसायटीच्या सभासदांच्या उत्कंठेने उच्चांक गाठला. "हे मूल कोणाचं? मानसी गरोदर नव्हती. जिजींचं? कुठून आलं आणि कसं?"
"मानसीच्या बाबांना जाऊन दोन वर्षं झाली.
काय गौडबंगाल आहे हे?"
सेक्रेटरीनी मनोजला तो हैराण होईपर्यंत प्रश्न विचारले व तंबी दिली. सोसायटी सोडून जावे लागेल अशी धमकी दिली. आता मात्र पाणी गळ्यापर्यंत आले होते. त्याने मानसीबरोबर चर्चा केली.
"सेक्रेटरीसाहेब, मी उद्या संध्याकाळी तुम्हाला सगळं सविस्तर सांगतो. सर्व सभासदांना बोलावून घ्या. एवढं नक्की की कोणताही अनैतिक किंवा लज्जास्पद प्रकार घडलेला नाही."
-------------------------------------------
"माझ्या सभासद मित्र मैत्रिणींनो, आमच्या घरात घडत असलेल्या घटनांनी तुम्हाला विचारांच्या गुंत्यात अडकवून ठेवलं. मी थोडक्यात आमची परिस्थिती कथन करतो. लग्नानंतर पाच वर्षांपर्यंत अपत्यप्राप्ती न झाल्यामुळे आम्ही इलाज चालू केले. तिथेही निराशा पदरी पडली. डॉक्टरनी मानसीला अपत्यप्राप्ती असंभव असल्याचे सांगितले. तिचा गर्भाशय कमकुवत आहे. आमच्या पायाखालची जमीन सरकली. जीवनात काळाकुट्ट अंधार. तेव्हा डॉ. सरोज वैद्य ह्यांनी सरोगसीचा पर्याय सुचवला. परंतु आम्हाला हवी तशी सरोगेट माता मिळाली नाही. पुन्हा निराशा. तेव्हां आम्हाला जिजींनी आशेचा किरण दाखवला."

"म्हणजे?" कोरसमध्ये प्रश्न विचारला गेला.
"जिजींनी सरोगेट मदर होण्याचा प्रस्ताव मांडला."
संमिश्र प्रतिक्रिया.
"काहीतरीच काय? ऐकावं ते नवलच, कमालच आहे बाई इ."
सगळ्यांच्या चेहऱ्यावर आश्चर्याचे मास्क. कोलाहल शांत झाल्यावर मनोज पुन्हा बोलू लागला.

"सरोगसीची पूर्ण प्रक्रिया डॉ. सरोज वैद्य ह्यांनीच केली. आम्हाला पुत्ररत्नाचा लाभ झाला. डॉक्टर आमच्या घरात आहेत. मी त्यांना घेऊन येतो."

आता सर्वांच्या चेहऱ्यावर कुतूहल पसरले. मनोज डॉ. वैद्य व मानसीला घेऊन आला
"नमस्कार, मी डॉ. वैद्य. ह्या प्रक्रियेच्या सुरूवातीपासून मी जिजी, मानसी आणि मनोज ह्यांच्यासोबत आहे. ह्या वयात सरोगसी पत्करणाऱ्या जिजींच कौतुक करावं तितकं थोडंच. त्यांना काहीसं कठीणच गेलं. परंतु प्रबळ इच्छाशक्तीमुळे सगळं शक्य झालं. मी शपथपूर्वक सांगते की ह्यात काहीही अनैतिक नाही. शुक्राणू व स्त्रीबीज ह्यांचे प्रयोगशाळेत मीलन करून, नंतर ते शरीरात घातले गेले. त्यासाठी जिजींच्या गर्भाचा वापर केला. असं समजा आता जन्माला आलेला मुलगा 'लिव्ह लायसेन्स'वर जिजींच्या गर्भात वास्तव्याला होता. आता तो मानसीच्या स्वाधीन असेल. देवकीकडून यशोदेकडे. तिघांच्या जीवनातला हा आनंद आहे. माझी विनंती आहे, किल्मिष मनात न ठेवता, पेढ्यांचा आस्वाद घ्या आणि नवजात बालकाला मनापासून आशीर्वाद द्या."

मानसी पेढे वाटू लागली. जिजींबद्दलच्या शंका कुशंकानी भरलेली मने त्यांच्याबद्दलच्या आदराने भारुन गेली. सर्वांना जिजींना भेटायचे होते. परंतु अशक्तपणा आल्यामुळे त्या घरात होत्या. पेढे वाटून मानसी व मनोज घरात आले तर---

---------------------------------------------------

"मानू मनोज, तुमची इच्छा पूर्ण झाली. मला भरून पावलं. तुम्ही सुखाने संसार करा. निघते मी."
दोघेही किंचाळले, "निघते? कुठे जिजी?"
"तुमच्या बाबांनी मला जिथून आणलं त्या महिलाश्रमात. मी आले तेव्हा तू एक वर्षाची होतीस आणि तुझा दादा तीन वर्षाचा. माझी मुलं समजून तुमचं संगोपन केलं. मला मातृत्व हवं होतं, पण तुमच्या बाबांना तिसरं मूल नको होतं. आपपरभाव करीन अशी भीती वाटली असावी. सरोगसीने ती इच्छा पूर्ण केली. तेच मातृत्व तुला प्रदान करते आणि निघते."
मानसी जिजींना मिठी मारुन रडू लागली.
"जिजी, जोखीम पत्करुन तू मला मातत्व मिळवून दिलंस. सावत्रआई ह्या नात्याविषयी इतरांकडून ऐकून माझं मन कलुषित झालं होतं. त्यामुळे मी तुझ्याशी वाईट वागत होते, पण ते विसरून तू मला बहुमोल मदत केलीस. माझ्या कातड्याचे जोडे करून घातले तरी ऋण फिटायचं नाही."
"अगंबाई, म्हणजे बाटा कंपनी बंद पडणार की काय?"
"जिजी, पी.जे. नको हां. तुझी आईची भूमिका संपली. आता आजीच्या भूमिकेत शिर. दुधावरच्या साईचा अनुभव घे. कुठेही जायचं नाही तुझ्या नातवाला सोडून."
"मानू, हुषार आहेस हां. चांदीची बेडी काढून सोन्याची घातलीस. हरली तुझी जिजी."
"नुसती माता नाही, महन्माता आहेस तू."

नारीने नारीस दिधला आधार
मातृत्व देऊनी सावरला संसार

**प्रा. रेखा विनायक नाबर**
मो. ९८६९४५१०५०